# काहीही न करता भरपूर कमवा

आजार का होतो ? ९०० टक्के नफा कसा होईल ? त्या बाबी प्रथम समजुन पहा आणि घरात व गचीवर लागवड करुन फायदा मिळवा, त्या नंतर औषधाची माहिती पाहून आजार बरे करा.

जेवण सर्वांना हवे पण उगवायाला कोण तयार नाही !! कारण, लोकांनी स्वप्नात सुद्धा विचार केला नसेल की, नांगरणी, खत, पाणी, पीकाचे रक्षण आणि तण (गवत) उपटून काढल्याशिवाय सुद्धा शेती करणे शक्य आहे. १९६० सालापासून ते आतापर्यंत स्व. श्री भास्कर हिराजी सावे जे उमरगांव-गुजरातचे शेतकरी होते, त्यांनी हे सर्व काम कोणताही खर्च न करता, 'भगवान' - देवाच्या निसर्गचक्राच्या मदतीने केले आहे. गेल्या ५५ वर्षापासून श्री. सावेचे परिवार कुठलीही आधुनिक कृषिची मदत न घेता विक्रमी उत्पादन मिळवत आहेत. १५ एकर विस्ताराच्या 'कल्पवृक्ष फार्म' मध्ये श्री. सावे पूर्वी आधुनिक कृषि कार्यपद्धतिची मदत घेऊन शेती करत होते, परंतु १९५७ साली त्यात त्यांचे भरपूर नुकसान झाले. तीन वर्षांत त्यांना आधुनिक कृषिच्या वाईट गोष्टी समजल्या आणि तेव्हा त्यांना कळून आले की, शेतीमध्ये नुकसानचे कारण त्यांची कमी मेहनत किंवा जमिनीची कमी सुपीकता नव्हती तर आधुनिक कृषिचे मायाजाळ आणि त्याबरोबर त्यांची जोडली गेलेली कार्यपद्धती होती.

ट्रेक्टरने होणारी खोलवर नांगरणी, रासायनिक खते, विषारी औषधे, पिकाचे रक्षण, गरज नसताना भरपूर पाण्याचा वापर आणि वारंवार उपटून काढलेल्या तण-गवतांमूळे जमिनीची रचना व सुपिकता कमी होते, 'भगवान' चे निसर्ग चक्र पाहून व **'जगा आणि जगू द्या'** च्या आध्यात्मिक गोष्टीमुळे सावेना शेतीचे खरे ज्ञान प्राप्त झाले होते. सावेनी पाहिले होते की, जंगलाचा विकास फक्त डोंगरावरच होतो आणि झाडांची मुळे लांबवर पसरतात. नांगरणी, खत, पाणी, औषधे किंवा तण काढल्याशिवाय सुद्धा जंगलाची झाडे दरवर्षी समान उत्पादन देतात याचे कारण तेथे कुठल्याही माणसाचा हस्तक्षेप नसतो. निसर्गचक्राची मदत घेऊन १९६० सालात सावेंनी एक लहानसा प्रयोग केला, परंतु त्यात शेतीचे उत्पादन ५० टक्कयांनी कमी होऊन, निव्वळ नफा जास्त मिळाला ! तो कसा ?

आधुनिक कृषित सावेंना १०० रुपयांची कमाई करण्यास ८० रुपयांचा खर्च होऊन २० रुपयांचा नफा होत होता. परंतु नवीन प्रयोगात पाणी सिंचन शिवाय काहीही न करता ५० रुपयांची कमाई होऊन त्यात फक्त १० रुपयांचा खर्च झाला व ४० रुपयांचा निव्वळ नफा झाला. त्या शिवाय त्यांना उत्पादनही निरोगी मिळाले. ह्या प्रयोगाचे फायदे पाहून कमी शिकलेल्या माणसालाही कळेल की, त्याला जास्त उत्पादनाची गरज आहे कि निरोगी उत्पादनाची ? त्याचबरोबर निव्वळ नफा हवा आहे की खर्च करुन फक्त उत्पादन हवे आहे ? जेव्हा आधुनिक कृषिचे मायाजाळ आणि भ्रम तुटले तेव्हा खर्चाशिवाय आधुनिक कृषि पासून जास्त शुद्ध उत्पादन कसे मिळवायचे ? याचा शोध घेण्यात आणि प्रयोग करण्यात सावे गुंतले होते. माहिती समजुन, कुंडी किंवा प्लास्टीक बेगमध्ये घरामध्येच लागणारी भाजी तुम्ही तयार करु शकतात.

सावेंनी संशोधन, निरीक्षण, निसर्गाचे विज्ञानचक्र, जीव-जंतुची मदत, सेंद्रिय पदार्थ आणि स्वत:तची कार्यपद्धती अमलात आणून मोठे यश मिळवले आहे. श्री. सावेंच्या सेंद्रिय कृषि पद्धतिचे अनुभव आणि ज्ञान आजच्या शेतीसाठी एक वरदान आहे. कारण ह्या कार्यपद्धतिने मिळणाऱ्या उत्पादनात **सर्व १२ जीवन-सत्वे उपलब्ध आहेत**, ज्यामुळे निरोगी जीवन मिळते शिवाय पर्यावरणांचे ही रक्षण होते. सगळयात मोठा फायदा म्हणजे जे शेतकरी अशिक्षित आहेत त्यांना कमी पाणी, कमी खर्च, कमी मेहनत आणि कुठल्याही कृषि ज्ञानाशिवाय जास्त उत्पादना बरोबर, निव्वळ नफा मिळू शकतो.

श्री सावेंना हे यश कित्येक वर्षांचे प्रयोग आणि अनुभवानंतर मिळाले होते. म्हणून ते पुन्हा पुन्हा सर्वांना सांगत होते कि, 'माझे शेत हीच माझी शाळा आणि विध्यापीठ आहे, तिथे प्रत्यक्ष काम करताना मला अनुभवास आले की **'काहीही न करता भरपूर कमवा'**. शेतकऱ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी, सावेनी कुठलीही अपेक्षा न बाळगता त्यांना मिळालेले अनुभव आणि सेंद्रिय कृषि पद्धतितील शोधून काढलेली गुपिते शेतकऱ्यांच्या चरणी समर्पित केली आहेत. **'आचारणा शिवाय उपदेश व्यर्थ आहे'** ही गोष्ट लक्षात घेऊन सावे सांगत होते कि, 'शेती कुठल्याही कार्य पद्धतीने करा परंतु सर्व शेती पद्धती मुख्यत: पाच बाबींवर आधारित असते आणि ह्या पाच बाबी निसर्गचक्र मुफ्त मदत करते.' ह्या पाच बाबी खालीलप्रमाणे आहेत.

**१) नांगरणी** : निसर्गाचे लष्कर, ज्यात छोटे छोटे किडे, जीव-जंतू, मुख्यत: गांडूळा सारखे जीव जे स्वत:च्या जगण्याच्या कार्य पद्धतीने जमीनीत भूयारा सारखे लहान लहान छिद्र करतात ज्यामुळे हवा-पाणी येणे-जाणे शक्य होते. शिवाय ह्या जीवांच्या मलमुत्रामुळे जमिनीची सुपीकता वाढते. ह्याच कारणामुळे **गांडूळाला शेतकऱ्याचा खरा मित्र मानले जाते.** ते ट्रेक्टरापेक्षाही सुंदर आणि खोल नांगरणी विना मोबदला करतात. तर ट्रॅक्टर डिझेल-तेल खाऊन मातीला आणि पर्यावरणाला हानी पोहोचवते.

**२) खत** : जमिनीची सुपीकता वाढवण्यास, सुका पाला-पाचोळा, शेण, घरा-घरातून फेकलेला भाजीचा कचरा (सेंद्रिय पदार्थ), इत्यादीचा उपयोग होतो. हे सर्व सेंद्रिय पदार्थ, झाडा-झुडूपांचे किंवा जमिनीचे खाद्य नाही, तर पशु आणि जमिनीत राहणारे जीव-जंतू ते खाऊन आपल्या मलाद्वारे झाडा-झुडूपांचे खाद्य तयार करतात. **जर निसर्गाच्या लष्कराकडून हे खाद्य फूकट मिळते तर विषारी खते विकत घेण्याचा मूर्खपणा का करावा ?**

**३) पाणी** : बहुतांश शेतकरी झाडांच्या मुळाशी गोलाकार रिंगमध्ये (अळी) जास्तीत जास्त पाणी सिंचन करुन मुळांवर अत्याचार करतात आणि याच कार्यपद्धतीमुळे आज पाणी जमिनीत अनेक फूट खाली गेले आहे. परंतु 'बांध आणि नाला' त्याच बरोबर 'क्रोटनचे रोप' यांचा उपयोग करुन झाडापासून १२ फुटाच्या अंतरावरुन पाणीसिंचन करुन ८० टक्के पाण्याची बचत होते. ही कार्यपद्धती अमलात आणून कष्ट न करता, खर्च आणि जमीन वाचवून, विहीर आणि बोरवेलच्या पाण्यात वाढ होते. ह्याचे कारण शेतातल्या **झाडा-झुडूपांना पाण्याची नाही तर ओलाव्याची गरज असते.**

**४) पिकाचे रक्षण** : गरज भासलीच तर निसर्गाने दिलेल्या सेंद्रिय वस्तुंचा उपयोग करुन द्रावण तयार करणे. जीव-जंतुना पिकांपासून दूर ठेवण्यासाठी गोमुत्र, कडूलिंब, तुलस आणि उग्र वनस्पती ज्या बकरी सुद्धा खात नाहीत, अशांपासून तयार केलेल्या द्रावणाचा उपयोग करणे. निसर्गाने लाल मुंग्या, कोळी, पाल व बेडुक इत्यादी जीवांची रचना केली आहे. असे जीव स्वत:च्या वजनापेक्षा जास्त जीव-जंतुना एका दिवसांत खातात. पक्षांमध्ये गिधाडे, घुबड, कावळा इ. पक्षी उंदिराची शिकार करतात. यांसारखे निसर्गातील बहुतेक जीव-जंतु, पशु-पक्षी स्वत:ला दिलेले काम चोख बजावून मानवाची मोठी सेवा करतात. याबरोबर एका आध्यात्मिक गोष्टीवर पण लक्ष ठेवायला हवे, प्रत्येक धार्मिक ग्रंथात लिहीले आहे की **'प्रत्येक मनुष्य ह्या संसारात एका रक्षणकर्त्याच्या रुपाने रिकाम्या हाती आला आहे आणि रिकाम्या हाती जाणार आहे म्हणून स्वत:पण सुख-शांतीने जगा आणि दुसऱ्याला पण जगू द्या.'** ह्या सृष्टिला निर्माण करणारे आणि त्याचे कार्यभार सांभाळणारे ब्रह्मा, विष्णू आणि महेश आहेत. ते स्वत:चे काम नीट सांभाळतात, मग विषारी औषधांची फवारणी करुन निर्दोष जीव-जंतूची हत्या करुन पापाचे गाठोडे का बांधवे ? ज्या पापामुळे आणि देवी-देवतांच्या कार्यात

हस्तक्षेप केल्यास त्याची शिक्षा आपल्या जीवनात दु:ख रुपाने मिळेलच.

**५) तण-गवत** : पुन्हा पुन्हा उगवणारे गवत (तण) हे शेतकऱ्यांना त्रासदायक वाटते व त्यांना ते आपले शत्रू समजतात. परंतु खरी गोष्ट अशी आहे की, **'गवत हे निसर्गाने दिलेले मोठे वरदान आहे.'** निसर्गाचे झाडा-झुडपांच्या मुळांना एक शक्ती दिली आहे. ज्यामुळे ते स्वत:च्या परिवारासाठी पाणी, कच्चा माल आणि नायट्रोजनची गांठ तयार करतात. शेतकरी ज्याला शत्रु समजतात तेच गवत धरती मातेला वस्त्र नेसवते आणि सुर्याच्या उष्णतेपासून मुळांनी साठवलेल्या भंडाराला सुरक्षित ठेवते. म्हणून निसर्गाने दिलेल्या गवताला उपटून काढू नका. जर आवश्यकता वाटली तर आपण केस कापतो तसे वर-वरचे गवत कापून पशुंना खाण्यास द्या. त्यामुळे शेण, पिकाचे रक्षण आणि मानवी रोग दूर करणारी औषधे स्वरुपचे गौवमुत्र, दुध आणि वाहतुकीच्या कामाला लागणारे बैल मिळतील. पशुंमुळे धन आणि भरपूर फायदा मिळत आहे, तरी सुध्दा पशुधन कत्तलखानाचे द्वारात लाईनमध्ये उभे केले आहेत!! वाह भारत देश वाह, खुपच छान प्रगती आहे.

श्री सावे हे गांधी बापूंचे भक्त होते आणि बापूंसारखीच समाजाची एकजूट आणि विश्वबंधूत्वाची भावना त्यांच्या मनात होती. श्री सावेंना स्वत:च्या आर्थिक परिस्थितीनुसार जितका शक्य होईल तितका सेंद्रिय शेतीचा प्रचार केला. परंतु फक्त प्रचार आणि आध्यात्मिक गोष्टींवर लोक विश्वास ठेवत नाहीत तर आज त्यांना जास्तीस जास्त वैज्ञानिक गोष्टी आणि जास्त कमाईचे ठोस पुरावे हवेत. तरीसुद्धा कसलाही खर्च किंवा कष्ट न करता मिळणारे उत्पादन पाहण्यास शेतकरी सावेंच्या फार्म मुलाखातीस येतात व दृश्य पाहून आश्चर्यचकित होतात. परंतु दु:खाची गोष्ट अशी की, शेतकरी आधुनिक शेतीला सोडून सेंद्रिय शेती अमलात आणण्यास नाकारतात, ते का? तर आजचा शेतकरी-समाज आधुनिक शेतीच्या मायाजाळात अडकला आहे. सावकाराच्या आणि बँकांच्या कर्जामध्ये पूर्णपणे बूडाला आहे. आधुनिक कृषि कार्यपद्धती शिवाय पण शेती शक्य आहे, हा विचार ते स्वप्नात सुद्धा करु शकत नाहीत.

सर्वांना ठाऊक आहे की, **'निरोगी जीवनासाठी गरज आहे निरोगी आहाराची'** परंतु आज बाजारात मिळणाऱ्या आधुनिक कृषि कार्यपद्धतीच्या संपूर्ण उत्पादनात विष आणि कमी पोषक तत्वे असतात. तसेच ते चवदार ही नसतात. अशा प्रकारच्या आहरामुळे मानव रोगीष्ट बनतो. रोग, कमजोरी आणि विलायती औषधांनी मनुष्य किती दिवस जगु शकेल?

मी अशोक संघवी २१ व्या वर्षीच विषारी आहाराची शिकार झालो. संपूर्ण जगात ज्या रोगावर इलाज नाही अशी सांधे दु:खी आणि वात (रुमेटिझम) मला झाले. अशावेळी व्यापारी असूनही नैसर्गिक उपचार आणि विषमुक्त आहार मिळण्यासाठी मी शेतीचा मार्ग पकडला, ज्याबाबतीत मला अ, ब, क, ड सुद्धा माहित नव्हते. शेतीज्ञान मिळवण्यासाठी मी सावेंच्या फार्मवर आलो आणि तेथील सेंद्रिय शेती पाहून मी प्रभावित झालो. १९८७ सालात, माझा २४ एकर 'संघवी फार्म च्या पडीक जमिनीत, **'श्री. सावेंची सेंद्रिय शेती कार्यपद्धती'** ची मी सुरुवात केली. ज्या जमिनात गवत सुद्धा उगवत नव्हते अशा दगडाळ आणि ओसाड जमिनीतून, कमी खर्च, कमी पाणी आणि कमी मेहनतीने, फक्त चार महिन्यात भरपूर निरोगी भाजीचे उत्पादन मिळाले आणि हळुहळु माझे सर्व आजार बरे झाले. शेतीचे ठोस पुरावे आणि गुंतवलेले पैसे नफ्यासकट मी परत मिळवले. सावेंचा फक्त पाणीद्वारे सर्वात आधिक शेत उत्पादन मिळाल्यामुळे आम्हाला **लिमका बुक ऑफ रेकोर्ड** मध्ये स्थान मिळाले. ह्या संपूर्ण योजनेला आणि सावे कार्यपद्धतीला सिद्ध करुन दाखवणारे होते **श्री. नरेश आणि सुरेश सावे.** ह्या नंतर मला सेंद्रिय कृषिचे महत्व समजले कि, खर्च केल्याशिवाय पण

शेती होते आणि निरोगी जीवन पण मिळते. प्रत्यक्ष कार्य पाहून मला कळाले की, पर्यावरणाची रक्षा, सर्व जीवांच्या निरोगी जीवनासाठी आणि मानवाला समृद्धी मिळवण्यासाठी फक्त एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे सावेंची सरळ कृषि पद्धती आणि ती कुठल्याही परिस्थितीत समाजापर्यत पोहोचलीच पाहिजे.' भारताची कृषि संस्कृति वाचवण्यासाठी, शेतकऱ्यांची आत्महत्या थांबवण्यासाठी आणि पर्यावरणाचे रक्षण करण्याचे अनुष्ठान पूर्ण करण्यासाठी मी जीवनात पहिलेच एक मराठी पुस्तक लिहीले, ज्यात ९०० टक्के नफा, त्याच बरोबर नवीन-जुन्या रोगांपासून खर्चाशिवाय मुक्ती कशी मिळेल ? याबद्दल मी माहिती दिली आहे, त्या पुस्तकसाठी Book Info. विभागात माहिती पहा.

**'स्वत:च्या डोळयानीं पाहा आणि मग विश्वास ठेवा'** यासाठी आम्ही सावे-संघवीनी प्रत्येक शनिवारी फार्मवर मुलाखतीचे आयोजन केले. देशातील तसेच विदेशातील संस्थांना आणि लोकांना सेंद्रिय शेती विज्ञान, उत्पादन आणि मिळणाऱ्या नफ्याचे मजबूत पुरावे दाखवून बऱ्याच वर्षांपासून आम्ही जनजागृती काम करत आहोत. ह्या निस्वार्थ कामामुळे आम्हाला देश-विदेशचे बरेच अवॉर्ड मिळाले आहेत. सर्व प्रकारचे फायदे मिळविण्यासाठी 'श्री सावेंची सेंद्रिय कार्यपद्धती' जगातील प्रथम कार्यपद्धती आहे, म्हणून देशाच्या हितासाठी त्याची 'पेटन्ट रजिस्ट्री' करणे फार गरजेचे होते, त्यासाठी मी हे काम सरकारला सुचवले. परंतु आजपर्यंत सरकारने कुठलाही पाठींबा किंवा सहयोग दिला नाही, असे का ? तर त्याचे मुख्य कारण आहे 'आधुनिक कृषिची संस्था' (लॉबी).

विदेशातील बऱ्याच कृषि संस्थाच्या उद्योगपतींना त्यांचे खत, औषधे, बियाणे, ट्रेक्टर इ. भारतामध्ये आधुनिक कृषिच्या नावाखाली विकायचे आहेत. पैशाच्या ताकदीने सर्व प्रकारच्या प्रसार माध्यमांनी आणि जाहिरातींनी सर्वांना मायाजाळात बांधून ठेवले आहे. एक वेळ आधुनिक कृषिने चार पट जास्त उत्पादन दाखवून शेतकऱ्यांच्या डोळयात धूळ फेकली आणि जेव्हा उत्पादन घटले तेव्हा म्हणतात 'शेतकरी अशिक्षित आहेत त्यांना खत-औषध किती प्रमाणात द्यावे त्याचे ज्ञान नाही.' तरीही त्यांच्या मायाजाळात फसलेला शेतकरी बाहेर जाऊ नये म्हणून ते नव-नवीन बियाणे, औषधे आणि योजना शेतकऱ्यांना दाखवतात. तसे पाहिले तर विदेशी कंपन्याचे मालक खूप चतुर असतात. एका बाजूला आधुनिक कृषित लागणऱ्या वस्तू उत्पादनाचे कारखाने सुरु केले आहेत, तर दुसऱ्या बाजूला रोग-राई बरे करणाऱ्या औषधांचे कारखाने आहेत त्याचे कारण, आधुनिक कृषिचे विषारी आहार खाणाऱ्याला १०० टक्के रोग होणारच. त्यासाठी औषधे आणि पोषकतत्वे मिळतील अशा खोट्या प्रचाराने टीन-फूड, टॉनिक आणि ॲसिड टाकून ठेवलेले शिळे खाणे लोकांना विकतात. अशा प्रकारे भारतीय जनतेला दोन्ही हातांनी लूटतात. याच गोष्टीला जरा सविस्तर पाहुया.

शेतीमध्ये जास्त उत्पादन मिळवण्यास आधुनिक कृषिचे संशोधन झाले आहे. त्याच प्रमाणे जास्त दुध आणि अंडी मिळवण्यासाठी जर्सी गाय आणि विलायती (बॉयलर) कोंबडीचे संशोधन केले. त्याच बरोबर बर्ड-फ्लू, मॅड काऊ, कॅन्सर आणि अनेक नविन रोगांची निर्मिती आणि अहिंसा मानणाऱ्या भारत देशात आतंकवाद पण सुरु झाला. आज आधुनिक संस्कृति, कृषि आणि विज्ञानामुळे लोकांचे शरीर अशक्त झाले आणि त्यामुळे ते रोगीष्ट जीवन जगत आहेत. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे ही विलायती औषधे महाग आहेत. ह्या औषधांचा काही फायदाही होत नाही कारण ही औषधे शारीरीक शक्तिच्या विरुद्ध कार्य करतात. याच गोष्टीचा एक पुरावा पहा, देवानी मनुष्यला शुध्द शाकाहारीच निर्माण केले आहे आणि आपण दगड खात नाही तरीसुध्दा, पतरीचा आजार होतो आणि ऑपरेशन नंतर ही पुन्हा पुन्हा होतो!! का ? कारण, कुठल्याही रोगाला विलायती औषधाची सुरुवात प्रथम कमी मात्राने होते आणि हळुहळु ती वाढत जाते, काही रोगींना तर, आयुष्यभर औषध खाण्याचा सल्ला मिळतो, फुकट मिळालेल्या शरीराला स्मशान किवां कचऱ्याचा

डबा समझुन, मेलेले पशु, मच्छी आणि बाझारचे वासी पदार्थ खाणे आणि निसर्गचे प्रत्येक कार्यमध्ये मानवाचा हस्तक्षेप हा एक मुख्य कारण आहे. अशा कठीण परिस्थितीत आपल्याला काही धडा शिकायला मिळतो ?

सरळ शब्दात याचे उत्तर आहे, **'निसर्गाकडे पुन्हा फिरा'**. जीवन जगण्यासाठी फक्त तीन गोष्टींची गरज आहे ते म्हणजे **'अन्न, वस्त्र आणि निवारा.'** जरी वस्त्र आणि निवारा नाही मिळाला तरी माणूस जगू शकतो परंतु विषारी अन्नाचा आहार घेऊन माणूस किती दिवस जगेल ? यासाठी जीवनात गरज आहे सेंद्रिय शेती करण्याची किंवा निरोगी जीवनासाठी फक्त सेंद्रिय शेती उत्पादनच खरेदी करण्याची. दु:खाची गोष्ट अशी आहे की, आजपण भारतात कुठेही सेंद्रिय शेती, नैसर्गिक उपचार किंवा पर्यावरण रक्षणाची माहिती दिली जात नाही. दुसरा पर्याय नाही म्हणून लोकांना आधुनिक औषधे आणि शेतीचे विषारी उत्पादनचा उपयोग करावा लागतो, या कारणानी भारतमध्ये आज एक माणुस शोधल्यावर सापडणार नाही ज्यानी जीवनांत एकवेळ पण विलायती औषधचा उपयोग केला नसेल.

सेंद्रिय शेती द्वारे आरामात मिळणारे धन सोडून अधिक धन मिळवण्यासाठी आज नवरा-बायको दोघेही नोकरी करतात. घरच्या गरजा पूर्ण करण्यासाठी बँकांकडून किंवा सावकारांकडून कर्ज घेतात आणि ते फेडण्यासाठी गाढवासारखे दिवस-रात्र मोल-मजूरी करतात. त्यामुळे तब्येतीकडे दुर्लक्ष होते आणि आजारी पडतात. तेव्हा निरोगी जीवनाच्या आशेने डॉक्टर आणि विदेशी औषधांच्या चक्रात फसतात आणि शरीराचे अवयव व कमवलेले धन गमावून आयुष्यभर दु:खी होतात. ह्या परिस्थितिपासून वाचवण्यासाठी आम्ही सावे-संघवी विनंती करतो की, सेंद्रिय शेती कार्यपद्धती अवलंबून, मोजकेच पाणी वापरुन आम्ही जसे निरोगी जीवन, सुख, समृद्धी, आनंद आणि शांतीचा मार्ग स्विकारला आहे, तसेच तुम्ही पण स्विकारा. ह्या सर्व बाबींचा अनुभव मिळवलेल्या ज्ञानाला समाजाला उपयोगी होईल ह्या उद्देशानी, शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीमध्ये भरमसाठ फायदा कसा होईल ?

या माहिती बरोबर समजेल त्या साठी आम्ही सावे-संघवी आणि भरत मनसाटेनी **'नैसर्गिक शेती प्रशिक्षण केंद्र'** शुरु केले आहे. एकावेळी २० लोकानां ठोस पुरावे दाखवुन, समजुन, शेतीचे काम प्रत्यक्ष करुन दाखवतात. देशानी हरवलेली समृध्दी परत मिळणारच तसे कृषि धर्मात लोकांची मदत-सहकार्य मिळाले तर भारत विदेशी कर्ज आणि मायाजाळापासून सुटेल. तुम्हाला या प्रशिक्षणामध्ये शिक्षण मिळवण्याची इच्छा असेल तर Training Classes विभागात दिलेल्या फॉर्म भरुन नावं दर्ज करावे. धनवान आणि सरकार मिळून आम्हाला **'नैसर्गिक शेती प्रशिक्षण केंद्रासाठी'** सहयोग करेल तर आम्ही संपूर्ण जगामध्ये एक ही नाही तसी, विध्यापीठ शुरु करण्यासाठी जागहा आणि सेवा फ्री देनार.

स्व. श्री सावे पध्धतीनी जमीनची सुपीकता परत मिळवण्याची माहिती तुम्हाला थोडक्यात मिळाली आता विलायती औषध विना आजार बरे करण्याची माहिती, मी अशोक संघवी माझा ४० वर्षाचा अनुभावद्वारे देत आहे. हे औषधसुध्दा नैसर्गिक आहे, ज्यांचे संशोधन २०० वर्ष पूर्वी जर्मन डॉक्टर श्री सुस्लरनी केले आहेत.

देवानी मानवी शरीर फक्त १२ क्षारी – औषधानी तयार केले आहे म्हणून जेव्हा शरीरमध्ये एकपण क्षार कमी किंवा वाढतो तेव्हा आपण त्याला आजार समझतो. आजारचा अभ्यास करुन शरीराला कुठला क्षार हवा ते शोधुन दिल्यावर लगेच कुठल्याही आजार बरा होतो ते सर्वबाबी डॉक्टरनी संशोधनानी शोधेले आहे. त्या १२ औषधांची नावे खाली दिली आहते, ती 6X पावरची औषधाची बोटल कुठल्याही होम्योपथीच्या दुकानात मिळेल. प्रत्येक औषधा पुढे नंबर आहे ते

१२ बोटलवर लिहुन ठेवा त्यामुळे औषध ओळखण्यास लगेच मदत होईल. औषधाची बरोबर अंग्रेजी तारीख सुध्दा लिहिली आहे त्या तारीखमध्ये जन्म असेन तर त्या नंबरची औषध त्या व्यक्तीचा जीवन क्षार आहे. आणि तो क्षार त्याचे आजार बरे करण्यासाठी उपयोगी होईल, या औषधाची बाबी विश्वचे बरेच डॉक्टरनी राशी-चक्रचा अभ्यास आणि संशोधन करुन शोधेले आहे. या १२ औषधांचे विशेष कार्य माझ्या मराठी पुस्तकात लिहिले आहे आणि त्या औषधानी कुठले आजार बरे होतात ते गुजराती, हिंदी आणि Organic Medicines विभागात पहा.

**१) कल्केरीआ फ्लोर (Calcarea Fluor - 6X) – Dt. 21/06 to 20/07**

**२) कल्केरीआ फोस (Calcarea Phos - 6X) - Dt. 21/12 to 19/01**

**३) कल्केरीआ सल्फ (Calacrea Sulph - 6X) - Dt. 24/10 to 22/11**

**४) फेरम फोस (Ferrum Phos - 6X) - Dt. 19/02 to 20/03**

**५) काली मुर (Kali Mur - 6X) - Dt. 21/05 to 21/06**

**६) काली फोस (Kali Phos - 6X) – Dt. 21/03 to 20/04**

**७) काली सल्फ (Kali Sulph - 6X) - Dt. 22/08 to 23/09**

**८) मेग्नशिया फोस (Magnesia Phos - 6X) Dt. 21/07 to 21/08**

**९) नेट्रम मुर (Naturm Mur - 6X) - Dt. 20/01 to 18/02**

**१०) नेट्रम फोस (Naturm Phos - 6X) - Dt. 24/09 to 23/10**

**११) नेट्रम सल्फ (Naturm Sulph - 6X) - Dt. 21/04 to 20/05**

**१२) सिलिशिया (Silica - 6X) - Dt. 23/11 to 20/12**

**समाज सेवा हीच प्रभुची खरी सेवा आहे.**

ईश्वराचा प्रसाद श्रध्दापूर्वक, धैर्य ठेवून आणि पथ्य पाळून जर का सेवन कराल, तर आजारचे नाव कुठलेही असुदे सर्व आजार ठीक होतील. ही औषधे दुधाच्या पाउडरमध्ये बनवतात आणि ती स्वादमध्ये गोड असतात. या औषधानी शरीरवर काही दुषपरिणाम होत नाही म्हणून, मी अशोक संघवी डॉक्टर नसुन सुध्दा ४० वर्ष पासून, माझा परिवार आणि बरेच लोकाना ही औषधे, ईश्वराचा एक प्रसाद समजुन फ्री दिली आहे. जे आजार विलायती औषधानी बरे झाले नाही, ते या औषधानी फक्त १५ दिवसात बरे झाले आणि भरपूर आराम मिळाले आहे त्या बाबीचे ठोस पुरावे माझा जवळ आहे. जर माझा बाबीमध्ये विश्वास बसत असेल आणि पथ्य होणार तरच ही औषध कामाची आहे, जी व्यक्ती कोल्ड्रिंग, सिगरेट, दारु, गुटका, तंबाखू, खातात आणि स्व:ताचा शरीराला कचरा भरण्याचा डबा समझत असेल त्याला देव पण मदत करु शकत नाही, म्हणून पथ्य खूपच गरजेचे आहे.

**पथ्य** : 'भगवान'- देवाच्या प्रसादीचा उपयोग करत आहात, तर मांस, मच्छी, अंडे, कॉफी, लसूण, कांदा, मिठाई, पाव, ब्रेड, मस्का, लोणी, मैदा, बिस्किट, मॅगी, चिझ, पिझा, चॉकलेट, लोणचे, विरझण टाकून बनवलेले खाद्य पदार्थ जसे चिंच, थंड पाणी, आइस्क्रिम, कोल्ड्रिंग, सिगरेट, दारु, गुटका, तंबाखू, तळलेली, जास्त तिकट, कच्ची किंवा तळलेली मिर्ची आणि जे आंबट लागेल ते खाणे सुरवातीचे **फक्त १५ दिवसांपर्यंत खाऊ नका.** औषधाची मात्रा १ किंवा २ गोळी

लहान १० वर्षाच्या बाळासाठी आणि बाकी लोकांसाठी ३ ते ५ गोळी चोखून घ्यावी. औषधाचा लगेच फायदा मिळवण्यासाठी औषधाचा१५ मिनिटे अगोदर आणि औषध चोखून १५ मिनिट नंतरच पाणी घेऊ शकतात.

**शुभ प्रभात :** सकाळी उठून प्रथम एक किंवा दोन ग्लास कोमट पाणी घेणे जरुरी आहे त्या नंतरच ब्रश करा. ब्रश नंतर जिभ होईल तितपर्यन्त बाहेर आणून जिभाचा आतल्या बाजुनी तीन बोटांनी जोरानी घासून उलटी करण्याचा प्रयत्न करावा. जिभच्यामध्ये कफ असतो तो नक्की बाहेर निघणार, आणि जर पोटात ॲसिड असेन तर तो आंबट किंवा कडू बाहेर निघणार. लक्षात ठेवा फक्त सकाळी फक्त ४ ते ६ वेळच हा प्रयत्न करायचा, जबरदस्तीनी पाणी बाहेर आणू नका, कारण त्यामुळे शरीरामध्ये कामाचे पाचक रस बाहेर पडेल. मी हा प्रयोग गेले ४० वर्षापासून करत आहे या कारणानी सुरुवातीमध्ये पोटात ॲसिड होते ते निघाले आणि माझे सांधा आणि वातचे आजार बरे झाले, उलटी करण्याचा प्रयत्नामुळे डोळयात पाणी येत होते त्यामुळे चश्माचे नंबर गेले आणि ७० वर्षात मोतीया गायब झाला. पूर्वी रोज पोट साफ करायला औषध घेत होतो ते बंद झाले आणि पोट साफ झाले यामुळे गॅसचा आजार बरा झाले. विलायती औषधानी लगवीचा आजार झाला होता ते सकाळी उठून कोमट पाणी घेतल्यामुळे किडनी पण साफ झाली आणि प्रोस्टेजमुळे थेंबथेंब लघवी होत होती तो आजार पण बरा झाला. बरेच लोकांना रोजच पोट साफ करण्याची सवय असते म्हणून बरेच प्रकारचे चुर्ण किंवा औषध खातात त्यामुळे आयुष्य कमी होते, त्या औषधानी संडासबरोबर कामाचे पाचक रस बाहेर पडतात, आतडी खेचली जाते आणि पाईल्स किंवा हरण्याचे आजार होत आहे आणि शरीरामध्ये पाणी कमी होऊन संडास कडक झाल्याबरोबर रोज जोर लावूनसुध्धा संडास बाहेर न आल्यास बोटाने काढतात. या आजारमधुन सुटकारासाठी रोज कोमट पाणी घ्या आणि वरील प्रमाणे प्रयोग करा. निसर्ग पध्दतीनी उलटीचा प्रयत्न केल्यानंतर डोळयावर पाणी मारा आणि गुळण्या करुन रिकाम्याच पोटी ईश्वराचा प्रसाद नंबर **4 / 5 / 8 / 10** गोळयां चोखून घ्या. नंतर १५ मिनिटे कसरत किंवा फिरण्यासाठी घालवा त्या नंतर दूध किंवा चहा बरोबर भरपूर नाष्टयांत चपाती, आलुपराठा, पोहे, उपमा खाऊ शकतात. फळात सफरचंद, चिकू, पपई, कलिंगड, टरबूज खाऊ शकतात. सर्व ड्राईफुट खाऊ शकतात. नाष्टयाच्या ३० मिनिट नंतर औषध नंबर **2** आणि **6** घ्या.

**दुपारचे जेवण :** जेवणाच्या १५ मिनिटापूर्वी गुळणी करुन तोंड साफ करणे नंतर **4 / 5 / 8 / 10** गोळयांचा रस चोखून घ्या त्या नंतर १५ मिनिटानी जेवण करावे. कोशिंबीर, भाकरी, भाजी, डाळ-भात यांचा जेवणात उपयोग करा. जेवणाचा ३० मिनिट नंतर औषध नंबर **2** आणि **6** घ्या.

**संध्याकाळी :** मराठी पुस्तकमध्ये १२ क्षारची संपूर्ण माहिती आहे आणि गुजराती, हिंदी आणि अंग्रेजी विभागत १२ क्षारची माहिती, जन्म तारीख प्रमाणे कुठल्या आजारवर कुठली औषध गरजेची वाटत असेल ते औषध घ्या. भुख असेल तर इडली, डोसा किंवा सकाळ प्रमाणे नाष्टा करा. बिना बर्फाचा उसाचा रस आणि लिंबू सरबत पिऊ शकता.

**रात्रीचे जेवण :** जेवणाच्या १५ मिनिटापूर्वी गुळणी करुन तोंड साफ करुन **4 / 5 / 8 / 10** गोळयांचा रस चोखून घ्या आणि १५ मिनिट नंतर जेवण करावे. रात्रीचे जेवण कमी घेतले पाहिजे, म्हणजे खिचडी, भाजी भाकरी, डाळ-भात घेणे उचित आहे. रात्रीचे जेवणानंतर शतपावली करावी. झोपण्यापूर्वी गुळणी करुन औषध नंबर **2** आणि **6** घ्या. १५ मिनिटानंतर एक ग्लास साधे पाणी पिऊन ईश्वराचे नामस्मरण करुन झोपा. संपूर्ण रात्र औषध - क्षार आपले काम करेल आणि १५ दिवसात शरीर शुध्द होईल.

**सूचना :** आपण कुठली विलायती औषधाचा उपयोग करत असेल तर ते बंद करु नका, कारण विलायती औषध कंपनी स्व:ताचा औषधाचा पुस्तकचामाध्यमनी डॉक्टर तयार करतात आणि त्याच डाँक्टरचामाध्यमनी सर्वाचां शरीराला त्यांचा औषधाची आदत केली जाते आणि तो एक प्रकारचा ड्रग्स असतो म्हणुन लगेच ते बंध करु नये. वरील १२ औषधानी

१५ दिवसानंतर फायदा झाल्यावर पथ्यमध्ये आपण बदली करुन पहा आणि कुठल्या पदार्थानी आजार होत आहे ते शोधुन ते बंद करा आणि आजारामधून सुटकारा मिळवा. समझा की वरील औषधानी आजीबात आराम होत नाही तर अन्य औषधाच्या नंबरचा विचार करावा. एक बाबी लक्षात ठेवा कुठलाही आजार एका रात्री होत नाही त्याच प्रमाणे एका रात्रीत जात सुध्दा नाही, फक्त विलायती औषध त्या आजाराला शरीरात दाबण्याचे काम करत असते म्हणुन पुन्हा पुन्हा ती विलायती औषध आयुष्यभर लोक घेतात. शरीरची शुध्धीकरण होत आहे तेव्हा अगोदर दाबले गेलेले आजार परत केव्हा तरी होतात ते पाहुन घाबरु नये आणि १५ दिवसा नंतर विलायती औषध १ / २ / ३ दिवसाचा अंतर ठेवुन स्व:ताचे डॉक्टर स्व:ता होऊन ती विषारी विलायती औषध बंद कराल तरच संपूर्ण निरोगी जीवन मिळणार.

१२ औषधवर विश्वास बसण्यासाठी एक बाबी समजणे जरुरी आहे. आपण आजारी पडलो की डॉक्टरकडे जातो आणि त्याला देव समझुन ते सांगतात ते रिर्पोट तयार करतात आणि आपली आजारची माहिति सांगुन, ते बरा करण्याची आपण विनंती करतो आणि दिवस-रात्री कमवलेले पैसे पण देतो. डॉक्टरानी दिलेली औषध देवाचा प्रसाद समजुन खऱ्या मनानी आपण घेत असतो. ७ ते १० वर्ष अभ्यास करुन ते डॉक्टर होतात आणि त्यांना शरीराची संपूर्ण माहिति असते तर आता सांगा, तो डॉक्टर होऊन सुध्दा आजारी का पडतो? डॉक्टर आणि आपण सर्व आजारी पडतात त्याचे कारण आहे अन्नद्वारे शरीराला लागणारे १२ तत्व मिळत नाही आणि आधुनिक शेतीद्वारे मिळते फक्त ३ तत्व (N.P.K.) आणि तो पण संपूर्ण विषारी, म्हणुन सर्व आजारी पडतात. या कारणानी आम्ही सावे-संघवी विनंती करतो की जीवनात कुठल्याही औषधा पासून कायमचा सुटकारा मिळवण्यासाठी सेंद्रिय शेतीनी उगवलेला आहरासाठी मागणी करा किंवा स्व. श्री सावे पध्दतीनी सेंद्रिय शेती करण्याची माहिति शिका.

परत एकदा सरकार आणि धनवानाला विनंती **खाली हाथ आले होते आणि खाली हाथ जाणारच**, म्हणून काहीतरी वेगळे करा आणि समाजाचे आशिर्वाद मिळवा. परत परत ही विनंती यासाठी, कारण २० वर्ष उमरगावमध्ये आम्ही सावे-संघवी ज्या ट्रस्टमध्ये होतो त्या माध्यमनी १०० टक्के कॅन्सर बरे करायचे म्हणून गुजरात गर्वमेन्टनी ट्रस्टला ५ एकरी फक्त जमीन हॉस्पीटलसाठी दिली होती. बरेच मोठे ट्रस्टना या कामात आम्ही मदत मागत होतो पण १० वर्षात कोणीही मदत केली नाही म्हणून सरकारला जमीन परत दिली आणि औषधचे काम पण बंध केले. सर्व शेती आणि आजारची माहिति असुन सुध्दा कोणी साथ-सहयोग देत नाही म्हणून विलायती औषध लोक खातात आणि तरफडून मरतात.

आपला सेवक - **अशोक संघवी** (फक्त सोमवार ते शुक्रवार दुपारी २ ते ४ साठी Mobile: +91 9821169907)



समाज सेवा प्रभु सेवा समजून शेतकऱ्यानां सावे माहिती देत आहे.



सावे आणि संघवी

**‘प्रत्येक मनुष्य ह्या संसारात एका रक्षणकर्त्याच्या रुपाने रिकाम्या हाती आला आहे आणि रिकाम्या हाती जाणार म्हणून नवी पिढीसाठी सर्वांनी साथ-सहयोग देणे गरजेचे आहे. स्वत:पण सुख-शांतीने जगा आणि दुसऱ्याला पण जगू द्या.’**